# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/09/2021 (रविवार)

---

## जबरी चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 35 कि.मी. अंतरावरील मौजा वडद शिवार नाल्याजवळ येथे दिनांक 18/09/2021 चे 16.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेंद्र नामदेवराव सातपुते वय 40 वर्षे, रा. प्लॉट न 145, इंगोले नगर, हुडकेश्वर रोड, गुरूमाउली सुपर बाजारच्या मागे नागपूर व त्याचा चुलत मामा प्रकाश बोडखे यांचेसह मौजा वडद शिवारातील नाल्याजवळील खाली प्लॉटवरील झाडाखाली दारू पित असतांना 03 अज्ञात आरोपी वय 35 वयोगटातील यांनी संगणमत करून त्यांना दगडाने मारून जखमी केले. यानंतर आरोपीतांनी फिर्यादी जवळील नगदी 4,700/–रू. व वन प्लस कंपनीचा नॉर्ड ॲन्ड्राईड मोबाइल किं. 20,000/–रू. व फिर्यादी यांचे चुलत मामा यांचे खिशातुन नगदी 3,500/–रू. व विवो कंपनीचा मोबाइल किं. 10,000/–रू. चा असा एकुण 38,200/'रू. चा मुद्देमाल त्यांना जखमी करून जबरदस्तीने हिसकावुन घेवुन गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 394, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री चंद्रकात मदने मो नं. 9922436195 हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील मौजा तारणी येथे दिनांक 17/09/2021 चे 14.30 वा. पुर्वी फिर्यादी नामे– रोशन निलकंठ सारवे वय 41 वर्षे, रा. जुना फुटाळा भरत नगर, अमरावती रोड नागपुर यांच्या शेतातील 02 मजली घराचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील हॉल, किचन, बेडरूम पॅसेज मध्ये लागलेले इलेक्ट्रिक बोर्ड काढुन त्यामधील 1) इलेक्ट्रीक वायरीग अंदाजे 1200 फुट कि. 8000/–रू., 2) दोन बाथरूम रूममधील 04 नळ किं. 2000/–रू., 3) एक सॅवर किंमती 2000/–रू., 4) वॉश बेसीन एक नळ किं. 1500/–रू., 5) किचन बेसीनमधील 02 नळ किं. 2000/–रू., 6) 02 स्टॉपकॉक किमती 2000/–रू. व 7) पेसेज मधील बेशीन फोडलेले असे एकुण 17,500/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ विजय कुमरे मोबाईल नं. 9823971453 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील मौजा ठाणा शिवार येथे दिनांक 17/09/2021 चे 17.10 वा. दरम्यान फिर्यादी यांना गोपनीय माहिती मिळाल्यावरून त्यांनी एमएच– 40/ बीएल– 7819 क्रमांकाचा वाहनाची तपासणी व विचारणा केली असता सदर वाहनात चालकाकडे कुठलीही रॉयल्टी नसल्याचे आढळून आले. वाहन चालक आरोपी नामे– महेश हटवार रा, पवनी जि, भंडारा व 2) कार्तीक वंजारी रा, भेंडाळा ता, पवनी जि भंडारा यांनी अवैधरित्या रेती वाहतूक करीत असल्याचे मान्य केले. परंतू वाहन चालक व मालक यांनी संगणमताने सदर वाहन पडवून नेले. वाहन क्र. एमएच–40/बीएल– 7819 मधील 700 घनफुट रेतीची कि. अंदाजे 53,300/–रू. व वाहनाची कि. 4,00,000/–रू. असा एकुण कि. 4,53,300/–रू. माल असून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे प्रदीप गोपिनाथ वर्पे (नायब तहसिलदार) वय 35 वर्षे रा. तहसिल कार्यालय उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. सहकलम 48(7) महा जमीन महसुल अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री डोर्लीकर मो.क. 75882377644 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत कालार नदी नांदा कोराडी येथे दि. 14/09/2021 चे 16.00 वा. ते दि. 17/09/2021 चे 08.00 वा.सुमारास प्रमोद गणपत मोहनकर (मृतक), वय 30 वर्ष, रा. नांदा कोराडी हा गावाजवळील कोलार नदीमध्ये आंघोळीकरीता गेला असता त्याचा पाय पाण्यात घसरल्यामुळे तो खोलपाण्यात गेला. त्याला पोहता येत नसल्यामुळे पाण्याच्या प्रवाहात तो वाहुन गेला. पो स्टे. खापरखेडा येथे मिसींग क्र 65/21 प्रमाणे नोंद घेण्यात आली होती. त्याचे प्रेत पो. स्टे. मौदा चे हद्दीत नदीचे काठी मिळुन आल्याने पो स्टे मौदा येथे मर्ग क्र 00/21 क 174 जाफौ प्रमाणे ची डायरी पो स्टे खापरखेडा ला प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा रविन्द्र बकाल पो स्टे मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा नावेद खान मो नं 8208511663 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत गौंडखैरी, अमरावती रोड जि. नागपुर येथे दिनांक 17/09/2021 चे 16:30 वा. दरम्यान ओम सुनिल रोडे (मृतक), वय 18 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 बाजार चौक गौंडखैरी, अमरावती रोड जि. नागपुर हा स्पर्धापरिक्षेचा अभ्यास करित होता. त्याने स्पर्धापरिक्षेचा तानतनावामुळे त्याचे राहते घरी स्लॅपच्या लोखंडी जाळीला दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला. याबाबत पोस्टे वाडी येथे 00/21 कलम 174 जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला होता नमुद मर्ग मधील घटनास्थळ हे पोस्टे कळमेश्वर हददीत असल्याने सदर मर्ग बाबतची खबर पोस्टे कळमेश्वर येथे प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक भरत गुरनुले यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार उईके मो नं. 9970094709 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर